# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक ०६.०५.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०५.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून एकुण १,५४,०२५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,८४९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,८४,४५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकातील पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक १८.१२.२०२५ चे २०.३० वा. ते २२.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत महावीर नगर, रनाळा, ता. कामठी, जि. नागपूर येथे राहणारे फिर्यादी नितीन बापूरावजी गजभिये, वय ५२ वर्षे यांनी त्यांची ॲक्टीवा ६जी मोपेड क्र. एमएच ४० सीई ५९३९ किंमती ९०,०००/—रू. ची, त्यांचे राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद मोपेड गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी नामे मोहम्मद जैद आलम मोहम्मद कमरीन, वय २१ वर्षे, रा. फात्मा मस्जीद जवळ, मांजरी, यशोधरानगर नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे फैजान अंसारी, रा. मांजरी, यशोधरानगर, नागपूर याचेसह संगणमताने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले मोपेड वाहन किंमती ९०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी नवीन कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. श्री सुधीर बोरकुटे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

(गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे कळमना :— जिवे ठार मारणाऱ्या विधीसंघर्षग्रस्त बालकाविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी श्रीमती सोनिया मुस्तफा शेख, वय ४० वर्षे, रा. वाजपेयी नगर, अशरफी मस्जीद जवळ, फईम पटेलच्या घरी किरायाने, कळमना, नागपूर यांचा मुलगा नामे जोहरान मुस्तफा शेख, १७ वर्षे याचा एक विधीसंघर्षग्रस्त बालक मित्र याने फिर्यादीचे मुलास कॉल करून, दिनांक ०५.०५.२०२६ चे २२.०० वा. ते २३.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमना हद्दीत वाजपेयी नगर, अशरफी मस्जीदचे मागील मैदानात भेटायला बोलविल्याने, फिर्यादीचा मुलगा त्याठीकाणी गेला असता, विधीसंघर्षग्रस्त बालकाने अज्ञात कारणावरून, फिर्यादीचे मुलास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने, त्याचे गळ्यावर, डोक्यावर, कानाजवळ कोणत्यातरी धारदार शस्त्राने मारुन जिवानिशी ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमना येथे विधीसंघर्षग्रस्त बालकाविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

**<u>२) पोलीस ठाणे अजनी :— शासकीय कामात अडथळा करून शिवीगाळी करून, मारहान करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०४.०५.२०२६ चे १९.०० वा. सुमारास, पोलीस वाहतुक शाखा नागपूर शहर, परिमंडळ अजनी येथील फिर्यादी पोहवा. मपोहवा. सौ. मालती आत्माराम पाल, वय ५६ वर्षे ह्या पोलीस ठाणे अजनी हद्दीत, आनंद ग्लासेस दुकानसमोर, शताब्दी चौक येथे त्यांचे पोलीस सहकारीसह शासकीय कर्तव्य बजावित असता, एका दुचाकी चालकावर चालान कारवाई करीत होत्या. वाहन चालक आरोपी नामे इन्जमामुल कलीम खान, वय ३३ वर्षे, रा. प्लॉट नं. ९५, सुंदर नगर, बहादुरा रोड, खरबी, नागपूर यांने फिर्यादी बजावित असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण करून, फिर्यादींना शिवीगाळ करून, त्याचे जवळील बोरीने फिर्यादीचे डोक्यावर तसेच, हातबुक्कीने मारहान करून, पाहुन घेण्याची धमकी दिली. अशा प्रकारे आरोपीने फिर्यादी व त्यांचे सहकारी बजावित असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. वैभव गुंजाळ ९७६७२१९९८९ यांनी आरोपीविरूध्द कलम १३२, १२१(१), १२१(२), ३५१(२), ३५२ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे यशोधरानगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०१.०५.२०२६ चे २०.०० वा. ते दिनांक ०५.०५.२०२६ चे १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, प्लॉट क्र. बी—२०/१५३, आनंद नगर, एनआयटी गार्डन समोर, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती विजया मधूकर वानखेडे, वय ६५ वर्षे ह्या त्यांचे राहते घराचे मुख्य दाराला कुलूप लावून परिवारासह उजैन येथे देवदर्शनाकरीता गेल्या होत्या. दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडून, आंत प्रवेश करून, घरातील बेडरुमचे कपाटात ठेवलेले रोख १,५०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ६,७८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि. ए.के. हाटकर ९५९४५४३१६९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे शांतीनगर</u> :—** सौ. प्रविना प्रेमल पराते, वय ३५ वर्षे, रा. बस्तरवाडी, लालगंज, शांतीनगर, नागपूर ह्या दिनांक ०३.०५.२०२६ चे १६.३० वा. पासुन पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, अंगात— प्रिंटेड कुर्ती व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** कु. खुशी किशोर नागरे, वय २० वर्षे, रा. नंदनवन, झोपडपट्टी गल्ली नं. ३, हनुमान मंदीर जवळ नागपूर ही दिनांक ०२.०५.२०२६ पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— मध्यम, केस— काळे भुरकट, अंगात— निळ्या रंगाचा कुर्ता व काळ्या रंगाची लॅगीन घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते. ओळख— उजव्या खांद्याला जळाल्याचे निशान आहे.



प्रविना



खुशी

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**